

नमस्कार! मी सत्तू आणि ही माझी पत्नी – हेमा. आम्ही आमच्या शहरातील खासगी कंत्राटदाराकडे शौचकूप सफाई कामगार म्हणून काम करतो. मला माहीत आहे, आपल्यापैकी अनेकजण कोविड 19 महामारीच्या काळात नागरिकांची सेवा करीत आहेत. करोना व्हायरसपासून तुमचे संरक्षण होण्यासाठी आवश्यक संरक्षक सूचना मी आपल्याला सांगू इच्छितो.

**विशेष नोंध : या सूचना नियमित कार्यपद्धतीचा भाग नसून केवळ सफाई कामगारांनी कोविड 19 महामारीच्या काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती अतिरिक्त काळजी घ्यावी याकडे लक्ष वेधण्यासाठी आहेत.**

## आपल्या घरातून कामावर जाण्यापूर्वी या गोष्टी आवर्जून करा-



**1. आपले शरीर पूर्ण झाकले जाईल असे कपडे वापरा**



**3. पालिकेने दिलेला अत्यावश्यक सेवकाचा पास आपल्याजवळ ठेवा**



**5. हातमोजे, मास्क, एप्रेन, बूट या वैयक्तिक सुरक्षा साधनांचा (PPE) वापर करा** (जेथे मास्क उपलब्ध नसेल तेथे दोन तीन थरांच्या स्वच्छ कपड्याने नाक व तोंड झाकून घ्या)



**2. जर आपल्याला जखम झाली असेल तर त्यावर जलरोधक पट्टी लावा**




**4. हात धुण्यासाठी साबण आणि पाणी तुमच्याबरोबर ठेवा**



**6. स्वच्छ कपड्यांची एक जास्तीची जोडी आपल्या बरोबर राहुद्या**

## कामावर गेल्यावर या गोष्टी नक्की कराच-

1



हात साबणाने किमान 20 सेकंद धुवा

2



इथे दाखवलेल्या क्रमानुसार पीपीई घाला
(जर ते खराब झाले असतील तर ते बदलण्यासाठी अधिकाऱ्यांशी बोला)

3



केवळ पीपीई परिधान केल्यानंतर साफसफाईची उपकरणे आणि वाहन स्पर्श करा.

4



वाहनात पाणी, साबण / सॅनिटायझर ठेवा

5



सुरक्षित अंतर ठेवून सीटच्या विरुद्ध बाजूस बसा


6



डोळे, नाक, चेहरा, मास्क यांना स्पर्श करू नका

## कामाला सुरुवात करताना खालील पद्धतीचा वापर करा-

1




इतरांपासून किमान 4 फूट अंतर राहील याची दक्षता घ्या

2



शौचकूप सफाई क्षेत्र बॅरिकेड करा

3



शौचकूप सफाई पाईप हाती धरण्यापूर्वी, हातमोजे घाला

4



गाळ रिकामा केल्यानंतर, पाईप आणि बॅरिकेड्स साफ करा

5




मलीन जल जमिनीवर सांडले असेल तर त्यावर चुना पावडर टाकून निर्जंतुक करा

6



द्रव मळाची हाताळणी केल्यास, हात व्यवस्थित धुवा

7



शौचकूप सफाई साठी वापरलेली वाहन व इतर उपकरणे, जंतुनाशक वापरुन धुवा


## कार्यालयात काम संपवून परत गेल्यावर-



वैयक्तिक सुरक्षा साधने काढा



हात, चेहरा स्वच्छ धुवा



वापरलेले कपडे बदलून बॅगमध्ये ठेवा.



कपडे आणि वैयक्तिक सुरक्षा साधने निर्जंतुक करा



वैयक्तिक सुरक्षा साधने कोरड्या जागी वाळत टाका



नवीन कपडे आणि मास्क घातल्यानंतरच घरी जा

सर्दी, ताप,खोकल्यासारखी लक्षणे आढळल्यास ताबडतोब वैद्यकीय सल्ला घ्या

**कोरोना व्हायरस वर लढाईत, आपण सुरक्षित राहून विजय मिळवूया**

**Safety and Dignity to Sanitation Work | Urban Management Centre with support from BMGF | manvita@umcasia.org**